// प्रकरण - तिसरे //

# // संबंधित विषयावरील संशोधन //

३.१ प्रास्ताविक

३.२ संबंधित संशोधनाचा अभ्यास.

// प्रकरण ३ रे //

:: संबंधित विषयावरील संशोधन ::

3.१ प्रास्ताविक :-

मागील दोन प्रकरणामध्ये अभ्यासकाने संशोधन विषय, पार्श्वभूमी, संशोधनाची गरज, संशोधनाचे महत्व, संशोधनाचे शीर्षक, अध्यापक शिक्षणाची उद्दिष्टे, व्याप्ती आणि मर्यादा त्याप्रमाणे संशोधनाचे कार्यक्षेत्र आणि संशोधन विषयातील संज्ञांचा अर्थ या बद्दलचे स्पष्टीकरण केले आहे.

या प्रकरणामध्ये अभ्यासकाने आपल्या संशोधन विषयाशी संबंधित असलेल्या संशोधनाचा अभ्यास केला आहे.

"उस्मानाबाद जिल्हयातील विनाअनुदानित अध्यापक विद्यालयातील प्रशासकीय समस्यांचा चिकित्सक अभ्यास" या विषयाच्या अनुषंगाने संशोधन विषयाशी संबंधित असलेल्या पद्धतीचा अभ्यास अभ्यासकाने शिक्षण महाविद्यालय, बार्शी येथील तसेच शिक्षण महाविद्यालय, उस्मानाबाद येथील वाचनालयात जाऊन केला आहे. त्या बाबतीतील तपशीलांची माहिती सारांशरूपाने खाली दिलेली आहे.

** ३.२ संबंधीत संशोधनाचा अभ्यास :-

०१] प्रा. गुप्ता बी.आर. [पी.एच.डी. पंजाब विद्यापिठ]

०२] विषय : An Exploratory Investigation in to the present Educational Administration with a view to Streamlling it.

"शैक्षणिक प्रशासनातील संशोधन कार्य अधिक सक्षम करण्यासाठी वर्तमान स्थिती"

०३] या संशोधनाची उद्दिष्टे अशी आहेत की,

१] खालील बाबतीत सध्याची शैक्षणिक प्रशासनाची स्थिती चिकित्सक पद्धतीने अभ्यासणे प्रशासकीय भूमिका, कार्ये कडकपणा, वैयक्तिक स्वभाव वैचित्र्य. वरील शैक्षणिक कार्यप्रक्रियेवर विरूद्ध परिणाम करणे.

२] वर्तमान शैक्षणिक प्रशासनामध्ये अंतर्भूत असलेला साधेपणा [निदून] बाहेर काढणे.

३] वर्तमान शैक्षणिक प्रशासन सुधारण्यासाठी उपलब्धमाहिती वर व पाय-यावर सुधारणा सुचविण्यासाठी.

०४] संशोधन - निदान पद्धती :-

या प्रबंधाची निदान पद्धती ही सर्वेक्षण पद्धती

आहे. त्यामध्ये हायस्कूल, उच्चमाध्यमिक स्तरवरील ४०० मुख्याध्यापक, विभागीय जिल्हा पातळी वरील सहाय्यक, उपसहाय्यक शैक्षणिक अधिकारी २५, प्रशिक्षित पदवीधर शिक्षक १०००, उच्च माध्यमिक शाळेतील २०० शिक्षक यांची माहिती प्रश्नावली, मुलाखती, निरीक्षण या द्वारे प्राप्त करून त्याचे ची स्क्वेअर परीक्षो द्वारे पृथ:करण केले आहे.

[०५] संशोधनाचे निष्कर्ष :-

१] शैक्षणिक प्रशासनाचा अभ्यास करताना जसे कार्यरत असावे तसे वाटले नाही. सामान्य प्रशासन आणि शैक्षणिक प्रशासनात भेद आढळला नाही. वर्तमान निर्धारीत नियम, नियमावलीच्या बाहेर कार्यरत होण्यास शैक्षणिक प्रशासन नौकरशाही वृत्ती तयार नाही निरनिराळ्या पातळीवर आपसातील सहकार्य याला धर्मसत्तेचा विरोध, सहकार्याची पध्दती वरीष्ठ पातळी-वरून कनिष्ठ पातळीवर परंतु उलट नाही उदा. शिक्षका कडून प्रशासनाकडे नाही. प्रशासन निर्णय देण्यास अपूरे पडते.

२] राजकीय प्रभाव सर्वसामान्य शैक्षणिक प्रशासनात अडथळे आणणारा व नुकसान करणारा आढळून आला. कालबध्द रीतीने शैक्षणिक प्रशासनाचे मूल्यमापन केले जात नव्हते. नवनिर्मित होणाऱ्या सामाजिक स्थितिशी प्रशासन पध्दती उपयुक्त ठरली नाही.

३] शैक्षणिक प्रशासनामध्ये शैक्षणिक कार्य दत असताना जेष्ठतेला प्राधान्य देण्यात येत होते. प्रशासनात

वैशिष्ठ्यपूर्ण किंवा गुणवत्तेनुसार नेमणुका केल्या जात नव्हत्या. शैक्षणिक प्रशासनातील सेवापूर्व प्रशिक्षण दिले जात नव्हते. यामुळे सर्व संरचनेत यांत्रिकपणा अधिक आणि मानवीय अपेक्षांना महत्वाकांक्षांना व उद्दिष्ठांना कमीत कमी मान दिला जात होता.

[०४] शालेय प्रशासन शिक्षकांचे अनुभव, त्यांच्या भावना आणि आकांक्षा या कित्यांच्या योजना, कामाच्या पध्दती आणि हेतु यांना उत्तेजन देत नाहीत शाळेतील शिक्षकांना उत्साही, जागृत करण्याच्या स्थितित भागीदारांना अपयश आले. शाळेतील मानवी संबंध तुसडया हेतुने होते शिक्षक शाळेच्या प्रशासना बाबतीत नाऊमेद, अतृप्त आणि असमाधानी आहेत. शिक्षकांच्या व्यथा, कल्पनात सुधारणा करण्यास निरूपयोगी वाटत होते. शालेय प्रशासन लोकशाही पध्दतीने स्थापन करण्यात अपयश होते [१]

** ३.२.

[०१] प्रा. जोशी एच. आर. [पी.एच.डी. एम.एस. विद्यापिठ]

A Critical study of problems of Administration and finance in primary Education in the Gujarat State with special reference to the present workijg and the Role of panchayat Raj Bodies in southern Gujarat.

[०३] <u>संशोधनाची उद्दिष्टे</u> :-

संशोधनाचा मुख्य हेतू समस्यांचा अभ्यास करणे हा आहे.

१] १] <u>शैक्षणिक प्रशासन समस्या</u> -

कार्याची एकात्मता साधणे, वेतन श्रेणी, प्रशासकीय पध्दती शैक्षणिक विभागाचा आकार, शाळांची संख्या कार्यभार, नेमणुका, बढती बदली आणि शिक्षकांचे प्रशिक्षण.

२] <u>संशोधनाची उद्दिष्टे</u> :-

शालेय संघटन, बेशिस्तीचे प्रकार, परीक्षा, मूल्यमापन व शाळा आणि समाज यांच्या मधील हार्दिक संबंध.

[०४] <u>संशोधन लिखाण पध्दती</u> :-

या संशोधन लिखाणाची पध्दती ही नमुना निवड पध्दती आहे.

नमुना निवडीत कांही शिक्षणाधिकारी, शिक्षण महाविद्यालयातील प्राचार्य, संचालक, उपसंचालक, विभागावार माध्यमिक स्तरावरील संचालक, शिक्षण महाविद्यालयातील प्राध्यापक आणि शिक्षक, एकूण ३२५० प्रश्नावल्या पाठवल्या. विधानसभेच्या नियमानुसार मुलाखती घेतल्या. शैक्षणिक कार्यालयातील दप्तराचा सुध्दा संदर्भ घेतला.

[०५] <u>संशोधनाचे निष्कर्ष</u> :-

१] शैक्षणिक पात्रता, वेतनश्रेणी आणि विभागीय व जिल्हा पातळीवरील शैक्षणिक प्रशासन समाधानकारक नव्हते.

२] शैक्षणिक प्रशासनकांना योग्य प्रकारे प्रशिक्षण होण्याची व्यवस्था नव्हती.

३] वैज्ञानिक पध्दतीवर आधारीत बढती प्रक्रिया नव्हती.

४] प्राध्यापक आणि शिक्षक यांची उद्दिष्टांची पध्दती वस्तुनिष्ठ नव्हती.

५] ६० टक्के शाळांतून योग्य त्या व्यवस्था नव्हत्या.

६] शाळा तपासणी नियमित नव्हती.

७] शिक्षकांची कार्यक्षमता आणि अकार्यक्षमता यांच्यात भेद करण्याची साधने नव्हती.

८] विस्तारसेवा विभागाचे कार्य समाधानकारक नव्हते.

९] शालेय अभ्यासक्रमात नैतिक शिक्षणाला स्थान नव्हते.

१०] शाळा आणि समाज यांच्यामध्ये सहकार्य नव्हते.

११] शाळेतील माजी विद्यार्थ्यांच्या संघटना नव्हत्या.

१२] त्रैमासिक आणि सहामाही परीक्षांना योग्य स्थान देण्यात आले नाही.

१३] शाळेतील बढतीचे नियम विसंगत होते.

१४] परीक्षेतील निरीक्षकांना वैयक्तिक सुरक्षिततेला तोंड दयावे लागत होते. [३]

<u>३.४</u>

[०१] "लिंगजम्मान्नी ए. [पी.एच.डी. एम.वाय.एस. विद्यपिठ]

[०२] <u>संशोधन विषय</u> :-

Subject : An Enquiry in to the Impact of foreign countries on the system of Education in India Since - 1947.

१९४७ पासून पाश्चिमात्य राष्ट्रांचा भारतातील शिक्षण पद्दतीवर झालेल्या प्रभावांची किंवा परिणामांची चौकशी.

[०३] **संशोधनाची उद्दिष्टे :-**

१९४७ पासून भारतातील शिक्षण पद्दतीत इंग्लंड, अमेरिका, रशिया, फ्रान्स, जर्मनी, जापान, कॅनडा आणि युनेस्को यांच्या झालेल्या परिणामांचे, प्रभावांचे आणि निमित्तेचे बळ समजावून घेणे.

[०४] **संशोधनाची पद्दती :-**

अभ्यासाची चौकशी करणे किंवा अभ्यासातून माहिती मिळविण्याचा प्रयत्न करणे.

१९४७ पासून भारतातील शिक्षण पद्दतीतील बदल आणि शिक्षणातील नवप्रवाह यांचे टीकात्मक परीक्षण करणे आणि त्यांच्या उगमांचा मागोवा घेणे.

परराष्ट्र नितीकुशल अधिकाऱ्यांच्या मार्गातून माहिती एकत्रीत करणे.

सरकारी प्रमुखांकडून समर्पक किंवा प्रसंगोचित माहिती मिळवणे प्रविण आणि त्यातील विशेषज्ञ यांच्या मुलाखती घेणे.

प्रसंगोचित होणाऱ्या प्रकाशनांचा आणि पुस्तकांचा अभ्यास करणे.

[०५] संशोधनाचे निष्कर्ष :-

१] विद्यापीठ अनुदान मंडळ आणि पत्राद्वारे कोर्स यावर इंग्लंड मधील शिक्षणाचा भारतातील निरनिराळ्या विद्यापीठावर परिणाम झालेला दिसतो.

२] भारतातील राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेवर [एन.सी.ई.आर.टी.] अमेरिकेच्या शिक्षण पध्दतीचा फार मोठा परिणाम झालेला दिसून येतो. हे परिणाम पुढील विभागावर झालेले दिसून येतात. शालेय अभ्यासक्रम, सुचनात्मक शैक्षणिक साहित्य विज्ञान आणि गणित शिक्षण, मार्गदर्शन, विस्तार सेवा केंद्राचे कार्यक्रम कृती संशोधन, मूल्यमापन, सेमिस्टर पध्दती, कनिष्ठ महाविद्यालयांची स्थापना इत्यादी.

३] पत्रव्यवहाराच्या माध्यमातून भारतीय शिक्षण पध्दतीवर रशियाचा पुढिल बाबतीत फार मोठा प्रभाव पडलेला दिसून येतो. शालेय शिक्षण संघटनातील बदल, अभ्यासक्रमाची पुर्नरचना, कार्यानुभव कल्पनांची माहिती, कृतीतंत्र, शिक्षणाची निर्मिती, शिक्षक प्रशिक्षणाची प्रसिध्दी.

४] जर्मनी व कॅनडा यांचा प्रौढशिक्षण, औद्योगिक आणि तांत्रिक शिक्षण, सुट्टीतील शिक्षण इत्यादी बाबतीत प्रभाव दिसून येतो.

५] शेतीतील पुर्नरचनात्मक शिक्षणाबाबतीत जपानचा प्रभाव दिसतो व तसेच लहान कारखान्यांचा बाबतीत प्रभाव दिसून येतो.

६] जागतिक सक्तीचे प्राथमिक शिक्षण या बाबतीत युनेस्कोचा फार मोठा वाटा भारतीय शिक्षण पध्दतीत आहे. [४]

३.५

[०१] प्रा. कुमार एस.के. [पी.एच.डी. महाराजा सयाजीराव विद्यापिठ, बडोदा.

A study of the Development of Educational Administration in India through various commissions Appointed between 1954 to 1966

१८५४ ते १९६६ मधील विविध मंडळाद्वारे भारतामध्ये झालेल्या शैक्षणिक प्रशासन विकासाचा अभ्यास करणे.

[०२] संशोधनाची उद्दिष्टे :-

१८५४ ते १९६६ मधील विविध मंडळाद्वारे भारतामध्ये झालेल्या शैक्षणिक प्रशासन विकासाचा आज अभ्यास करणे.

[०४] संशोधन कार्यपध्दती :-

या संशोधन प्रकल्पाची लिखाण पध्दती ही ऐतिहासिक सर्वेक्षण पध्दती आहे. यासाठी विविध लेख, शासकीय मंडळाच्या नोंदी केंद्रीय सरकारने नेमलेल्या मंडळाच्या नोंदी, शैक्षणिक मासिके, पंचवार्षिक शैक्षणिक साहित्य ही या संकल्पना करिता उपयोगात आणलेली संशोधनाची साधने आहेत.

[५] संशोधन निष्कर्ष :-

१] स्वातंत्र्यानंतर ब्रिटीश सरकारने नेमलेल्या शैक्षणिक समिती वरती याच समस्येवर चर्चा झालेल्या आणि त्यानुषंगाने राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक यामध्ये गरज व मागणीच्या आधारे थोडासा बदल करणे.

२] भारतातील शैक्षणिक प्रशासनाच्या संबंधीत समस्येला तोंड देऊ शकत नाही किंवा वारंवार सरकारने नेमलेल्या मंडळाद्वारे सोडविता येत नाहीत. मंडळाद्वारे निघालेले शैक्षणिक प्रशासन हीच महत्वाची गोष्ट भारतामध्ये मानली जाते.

३] शैक्षणिक प्रशासना बाबतचा सध्याचा १० + २ + ३ या आकृतीबंध हा मंडळा द्वारेच नेमलेला आहे. [५]

३.६

[०१] मेहर के.टी. [पी.एच.डी. एम.एस. विद्यापीठ]

[०२] विषय : Evaluation of Administration of secondary Teachers Training Colleges in Maharashtra with Speca al Reference to the principal's Role.

महाराष्ट्रातील माध्यमिक शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालयातील प्रशासनाचे मूल्यमापन प्राचार्यांच्या भूमिकेच्या संदर्भात.

[३] संशोधनाची उद्दिष्टे :-

१] माध्यमिक शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालयात अस्तीत्वात असणाऱ्या वातावरणाचे मापक्रम करणे.

२] शिक्षक प्रशिक्षकाच्या [एज्युकेटर] नितीमत्तेचे किंवा त्यांच्या शिस्तीचे मापन करणे.

३] महाराष्ट्रातील शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालयातील कार्यक्रमांची परिणामकारकता ठरविणे.

४] प्राचार्य [मुख्याधिकारी] यांच्या नेतृत्वातील वर्तणुकीचे मूल्यमापन करणे.

५] वर्गीकरण प्रमाणाच्या मदतीनुसार प्राचार्यांच्या अग्रक्रम आदेशांचा निर्णय करणे.

[४] संशोधनाची पद्धती :-

या संशोधन प्रकल्पाची निरीक्षण पद्धती ही सर्वेक्षण पद्धती आहे. महाराष्ट्राच्या विविध निरनिराळ्या प्रादेशिक विभागातून २६ शिक्षणशास्त्र महाविद्यालयांचे नमुना म्हणून नार्मेटीव्ह सर्वेक्षण केले आहे. प्राचार्यांची संख्या २६ होती आणि प्रशिक्षित शिक्षकांची संख्या १९० होती अभ्यासासाठी पुढील साधनांचा उपयोग केला.

१] हाल्पीन आणि क्रॉफ्ट यांची संघटनात्मक वातावरणाच्या वर्णनाची प्रश्नावली [ओ.सी.डी.क्यु] १९६३

२] बेंटले आणि रेम्पेल यांनी काढलेल्या शिक्षकांची मते [पी.टी.ओ] १९७०.

३] हाल्पीन आणि क्रॉफ्ट यांनी योजीलेल्या नेतृत्वातील वर्णणुकीच्या वर्णणात्मक प्रश्नावली [एल.बी.डी.क्यु.]१९६३.

४] नेतृत्वाच्या वर्तणुकीच्या वर्णनाची प्रश्नावली [हरी - स्वत:]

५] शिक्षकांच्या शैक्षणिक आकृतीबंधाचे परिणामकारक रीत्या मूल्यमापन करणारी प्रश्नावली.

६] प्राचार्यांच्या भुमिकेच्या वर्गवारी प्रमाणातून मूल्यमापन.

७] महाविद्यालयाच्या परिचयाची माहिती [डेटा] तसेच शिक्षक अध्यापक आणि प्राचार्यांची माहिती मिळविणे. त्यांच्या बरोबर मुलाखती आयोजित केल्या, सांख्यकीय पध्दती वापरली होती. गुणकपद, विश्लेषण, निरनिराळ्या विश्लेषण पध्दती, ची स्क्वेअर आणि टी टेस्ट यांचा वापर केला.

[५] संशोधनाचे निष्कर्ष :-

१] कालमाना प्रमाणे [हवामानातील प्रवाह] महाविद्यालयांची रचना खुल्या आणि बंद वातावरणात करणे शक्य होते. ग्रेटर मुंबईतील महाविद्यालये ही टाऊन मधील महाविद्यालयांपेक्षा अधिक खुली वाटतात.

२] प्रशासकीय अनुभव, अर्थपूर्ण संबंध आणि वाता-वरण पध्दती यांच्या मध्ये स्थापल्या सारखे वाटते परंतु हे संबंध प्राचार्यांच्या अनुभवाप्रमाणे स्थापल्या सारखे वाटत नाहीत. वातावरण पध्दती आणि व्यवस्थापन प्रकार यांच्यामध्ये कोणतेही संबंध दिसले नाहीत. किंवा महाविद्यालयाच्या नाविण्यपणा किंवा अकार यांच्यात सुध्दा संबंध दिसले नाहीत.

३] शिक्षण महाविद्यालयात शिक्षकांच्या नितिमत्तेची भिन्नता आढळते परंतु प्राचार्यांच्या अनुभवा [वयोमाना] प्रमाणे ही

नितिमत्ता त्या-त्या शाखेतल्या अनुभावावर आधारलेली दिसून येते परंतु व्यवस्थापन पद्धतीवर अवलंबून दिसत नाहीत आणि महाविद्यालयाच्या स्थापना वर्षापासून किंवा त्यांच्या स्वतःच्या वयाबाबतीत नितिमत्ता दिसून आली नाही.

५] महाविद्यालयातील वातावरण शिक्षकांच्या नितिमत्तेशी अति जवळचे संबंधीत वाटतात.

६] शिक्षकांच्या अध्यापकांचे [एज्युकेटर] यांच्या स्थापत्तीचा अहवाल यांच्यातील वातावरण अधिक खुले व मोकळेपणाचे होते.

७] होकारात्मक आणि अर्थपूर्ण संबंधाचे ज्ञान शिक्षक अध्यापक आणि प्राचार्य यांच्या वर्तणुकीत दिसून येत होती आणि स्वतःच्या ज्ञानाबाबतीत सुध्दा दिसून येत होती.

८] या बाबतीत चार गुणकपद काढण्यात आले लोकशाहीत्मक प्रशिक्षण सहकाऱ्यांचा दृष्टीकोण, आर्थिक बैठक, आणि फायनान्स [अर्थ] हे शिक्षकांचे प्रशिक्षण त्यांचा प्रभावीपणा समजावून घ्यावयास स्वतंत्र घटक मानले जातात की जे निरनिराळ्या कॉलेजात निरनिराळ्या स्वरूपात आढळतात.

[६]

** ३.७

०१] पण्डा एस.एन. [पी.एच.डी.]राजस्थान विद्यापीठ]

०२] विषय :

मुख्याध्यापकांची प्रशासकीय वर्तणूक घटकांची पार्श्वभूमी
व काही सहसंबंध

[०२] संशोधनाची उद्दिष्टे :-

१] मुख्याध्यापकांच्या प्रशासकीय वर्तणुकीत आढळणारे खऱ्या स्वरूपाचे आदर्शभूत प्रारूप शोधून काढणे.

२] प्रशासकीय वर्तणुकीचे वास्तविक आणि आदर्श स्वरूप अभ्यासणे आणि वर्तनबद्दल व शाळेला प्रभावित करणारी संस्था आणि त्यांची प्रतिष्ठा अभ्यासणे.

३] प्रशासकीय वर्तनबद्दल प्रारूपांच्या घटकामागील पार्श्वभूमी समजावून घेणे.

** संशोधनाची पद्धती :-

हा अभ्यास राजस्थानमधील २००० शिक्षकांवर [१६८ शाळांतील] विशिष्ट स्तरातील निवडलेली नमुनाशी वापरून उच्च माध्यमिक विरुद्ध माध्यमिक आणि ग्रामीण विरुद्ध शहरी मुले विरुद्ध मुली इत्यादी बाबतीत मुख्याध्यापकांचे वर्तन, मुख्याध्यापकांच्या वर्तनबदलातून त्यांच्या मूळ कल्पना, वास्तविकता आणि पार्श्वभूमी इत्यादींचा विचार करून वर्णनात्मक प्रश्नपत्रिका निर्मिती व त्याद्वारे आदर्श आणि वास्तविक स्वरूपाचे फरक आणि पार्श्वभूमी वर्णनात्मक प्रश्नावलीद्वारे जाणून घेणे त्यांची सत्यासत्यता निर्धारित शाळेतून मान्य करून घेणे. उपलब्ध माहितीचे पृथ:करण हे ची स्क्वेअर टेस्टच्या द्वारे केले गेले आहे.

[०४] संशोधनाचे निष्कर्ष :-

१] मुख्याध्यापकांचे प्रशासकीय वर्तन स्वातंत्र्यावर, अधिकारशाहीच्या जोरावर पारंपारिक पध्दतीवर, भावनाशून्य, बौध्दीक आणि सकारात्मक व नकारात्मक आणि सहसंबधावर कमीत कमी भार असलेले फलनिष्पत्तीवर कमीत कमी आधारलेले आणि इतरांना कमीत कमी मान्यता देणारे होते.

२] आदर्श स्वरुपाचे प्रशासकीय वर्तन लोकासाठी ब्रम्हज्ञान स्वरुपाचे फलनिष्पत्ती करणारे पूर्वपरवानगीच्या स्वरुपाचे सहसंबंधावर आधारलेले रचनात्मक आणि जुळवून घेणारे आणि हुकूमशाही युक्त अशा तंत्राने व बौध्दीक दृष्टया भावनाशुन्य पारंपारिक आणि नकारात्मक स्वरुपाचे होते.

३] मुख्याध्यापकांच्या परिणामकारक शाळा इतरांच्या पेक्षा परीस्थिती प्रमाणे जमवून घेतलेल्या दिसल्या, कमी अधिकार युक्त आणि कमी नापसंती ची होत्या.

४] शहरी शाळातील मुख्याध्यापक हे अधिक संयोग धार्मोचे असून परिस्थीतिशी जमवून घेणारे होते आणि दळणवळणाच्या बाबतीत परिणामकारक होते आणि कमी नापसंतीचे होते.

५] मुलांच्या शाळेचे मुख्याध्यापक ही अधिकारयुक्त होते कमी दळणवळणाच्या संबंधित होते, परिस्थितीशी कमी जमवून घेणारे होते आणि मुलींच्या शाळांच्या मुख्याध्यापकाशी तुलनेच्या बाबतीत कमी परवानगी देणारे होते.

[६] या पार्श्वभूमीवरील गुणकपद हा मुख्याध्यापकांच्या प्रशासकीय वर्तणुकीशी संबंधीत होता, शिक्षकांच्या कामाच्या बाबतीत विविधता आणणारा होता, उदा. शिक्षकांमधील गटबाजी, विद्यार्थ्यांची शिक्षणातील बेपरवाई, जवळ्यासध्या समजातील साक्षरते बाबतचा स्तर, अधिका-यांच्या कडून प्रशासनात हस्तक्षेप आणि स्वतःचे अतिशय त्रोटक ज्ञान. [७]

** ३०८

[०१] खुशदिल एन [पी.एच.डी. जे.एम. विद्यापिठ]

[०२] विषय :

An investigation in to the mutual Role Expectations and Actual Role perceptions of the principals and Teachers of senio secondary school of Delhi.

परस्पर संबंधीत अपेक्षांच्या भूमिकेत चौकशी आणि प्राचार्यांचे स्वतःच्या भूमिकेबद्दलचे ज्ञान आणि दिल्ली मधील उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षकांचे स्वभूमीकेचे ज्ञान.

[०३] संशोधनाची उद्दिष्टे :-

१] प्राचार्यांच्या भूमिके बद्दलच्या शिक्षकांच्या अपेक्षांच्या साधनांचे मोजमाप करण्यासाठी साधने निश्चित करणे [योजने] आणि त्यांची मोजणी करणे.

३] शिक्षकांच्या भूमिकेबद्दल प्राचार्यांच्या अपेक्षा असतात त्या मोजण्यासाठी साधने शोधून काढणे.

४] संबंधित प्राचार्यांच्या आपल्या शिक्षकांच्या भूमिकेच्या अपेक्षाबद्दल शिक्षकांची असणारी समज शोधून काढणे.

५] शिक्षकांच्या अपेक्षा या प्राचार्यांच्या भूमिकेवर अवलंबून आहेत किंवा शिक्षकांच्या शैक्षणिक पात्रतेवर किंवा त्यांच्या अनुभवावर अवलंबून आहेत, यांचा शोध करणे.

६] शिक्षकांच्या अपेक्षा या प्राचार्यांच्याज्ञानावर अवलंबून आहेत किंवा प्राचार्यांच्या शैक्षणिक पात्रतेवर या अनुभवावर अवलंबून आहेत याचा शोध घेणे.

७] शिक्षकांच्या भूमीके विषयी असणाऱ्या प्राचार्यांच्या अपेक्षा या प्राचार्यांच्या शैक्षणिक पात्रतेवर किंवा अनुभवावर अवलंबून आहेत का याचा शोध घेणे.

८] शिक्षकाच्या भूमिकेबद्दल प्राचार्यांच्या असणाऱ्या अपेक्षा या शिक्षकांचे ज्ञान, त्यांच्या शैक्षणिक पात्रतेवर किंवा अनुभवावर आहे का याचा शोध घेणे.

९] शिक्षक आणि प्राचार्य यांच्यामध्ये परस्पर संबंधित अपेक्षा व ज्ञान या बाबतीत असलेली तफावत शोधणे.

१०] पुरुष आणि स्त्री शिक्षक आणि प्राचार्य यांच्यामध्ये असलेल्या अपेक्षा आणि समज, यांच्यात काही तफावत आहे का हे शोधणे.

[०४] <u>संशोधनाची पद्धती</u> :-

अन्वेषकांकडून दोन वेगळ्या सविस्तर याद्या तयार करताना साधनांचा अभ्यास केला होता आणि या साधनांच्या द्वारे प्राचार्यांच्या अपेक्षेच्या भूमिकेची शिक्षकांकडून मोजणी करणे आणि शिक्षकांच्या अपेक्षाबद्दल प्राचार्यांची समज यांचा ही अभ्यास करणे. पाहिली सविस्तर यादी ही शिक्षकांची प्राचार्या बद्दल अपेक्षा, तिला टी.ई.पी. म्हणतात. ही सविस्तर यादी शिक्षकांच्या खालील कार्याची माहिती २२.

अ] अध्ययन – अध्यापन प्रक्रिया.

ब] अभ्यासेतर कार्यक्रम.

क] प्रशासकीय कार्यक्रम.

ड] स्वानुभव प्रक्रिया

इ] लोकसंबंधित प्रक्रिया.

दुसरी सविस्तर यादि ही प्राचार्यांच्या शिक्षकांबद्दलच्या अपेक्षा तिला पी.ई.टी. असे म्हणतात ही यादी प्राचार्यांच्या खालील कार्याची पुढील प्रमाणे माहिती देतात –

अ] हेतू

ब] अभ्यासेतर नियोजन.

क] संघटन

ड] कार्यवाही

इ] मूल्यमापन.

वैयक्तिक माहितीचा कागद हा विषय, पात्रता आणि अनुभव यांची माहिती गोळा करण्यासाठी उपयोगात आणला होता. सर्वेक्षणात्मक माहितीच्या विश्लेषणासाठी आणि चौकशीप्रधान

आकृतीचा नमुना काढण्यासाठी ४५० शिक्षक आणि ६० प्राचार्य निवडले होते.

[०५] संशोधनाचे निष्कर्ष :-

१] प्राचार्य आणि शिक्षकांची लोकशाहीयुक्त भूमिका अत्यंत महत्वाची आहे. या नंतर शिस्तबध्द आणि अधिकारयुक्त उत्तेजना देणाऱ्या भूमिका येतात.

२] प्राचार्यांच्या अपेक्षा आणि शिक्षकांची समज किंवा ज्ञान यांच्या अर्थ बाबतीत तफावत दिसून येते.

३] शिक्षकांना जी भूमिका करावीशी वाटते त्या पेक्षा शिस्तबध्द भूमिका शिक्षकांनी करावी असे प्राचार्यांना वाटते.

४] शिक्षकांच्या अपेक्षाहून प्राचार्यांचे अधिकारयुक्त भूमिकेचे ज्ञान अधिक वाटते.

५] प्राचार्यांच्या अपेक्षा आणि शिक्षकांचे ज्ञान - एकमेकांशी सहकार्याच्या भूमिके बद्दल या दोघांमध्ये थोडीशी तफावत आढळते.

६] प्राचार्यांच्या अपेक्षा आणि शिक्षकांचे ज्ञान - यांच्या अभ्युच्च भूमिके बाबतीत दोघांच्यात कोणतीही तफावत आढळत नाही.

७] शिक्षकांना जी भूमिका करणे आवडते त्यापेक्षा ही शिक्षकांनी कांही वेगळी भूमिका करावी अशी प्राचार्यांची अपेक्षा वाटते.

८] सहकार्याच्या भूमिकेला प्राचार्यांनी अभ्युच्च स्थान दिले आहे. आणि त्यानंतर सभिक्षणात्मक भूमिकेचा क्रमांक येतो.

९] शिक्षकांच्या पात्रतेचा मुद्दा हा नकारात्मक दिसतो आणि हाच मुद्दा त्यांच्या अनुभवाच्या बाबतीत अर्थबद्ध दिसून येतो.

१०] लोकशाही प्रधान भूमिका आणि शिस्तबद्ध, उत्तेजनात्मक आणि अधिकारयुक्त भूमिका यांच्यातील सहसंबंध नकारात्मक होते आणि अत्यंत अर्थपूर्ण होते.

११] प्राचार्यांच्या पात्रतेचा मुद्दा हा पुढील ०४ भूमिकेशी अर्थाअर्थी नव्हता. या चार भूमिका पुढील प्रमाणे - लोकशाही प्रधानता, शिस्तबद्धता, उत्तेजनात्मक आणि अधिकारयुक्त भूमिका, प्राचार्यांचा अनुभव हा इतर कोणत्याही भूमिकेशी संबंधीत नव्हता.

१२] प्राचार्यांची लोकशाही प्रधान भूमिका ही शिस्तबद्ध उत्तेजन प्रधान आणि अधिकारयुक्त भूमिकेच्या अर्थाशी संबंधित होते आणि नम्रतायुक्त भूमिकेशी सहकार्याच्या भूमिकेत नकार दिसतो.

१३] प्राचार्यांच्या अपेक्षांच्या ज्ञानाबद्दल शिक्षकांच्या पात्रतेचा मुद्दा हा स्वतंत्र होता.

१४] अपेक्षा आणि समज - ज्ञान यांच्या मध्ये कोणतीही तफावत आढळली नाही.

१५] शिक्षकांच्या अपेक्षा या त्यांच्या पात्रते कडून किंवा अनुभवाकडून प्रभावित झालेल्या नव्हत्या.

१६] शिक्षकांच्या पात्रता व अनुभव या बाबतीत प्राचार्यांच्या अपेक्षा स्वतंत्र होत्या.

१७] प्राचार्यांच्या शिक्षकां बद्दलच्याअपेक्षा या बाबतीत लिंगभेद हा गुणदान भाग नव्हता [नाही].

# // BIBLIOGRAPHY //

(01) M.B. BUCH (EDITOR)

"Second survey of Research in Education (1972 - 1978)

Published by M.B. Buch, on be-half of the Society for Educational Research and Development, 46, Harinagar, Gotri Road, Baroda - 390007 (India) and priented at modern printers Ahmedabad-380009. - 1979.

P.N. 472.

(02) M.B. BUCH (EDITOR)...

"Second Survey of Research in Education".

P.N. 476.

(03) M.B. BUCH (EDITOR) ...

"Second survey of Research in Education".

(04) M.B. BUCH (EDITOR)....

"Second survey of Research in Education.

P.N. 478

(05) M.B. BUCH (EDITOR)...

"Second survey of Research in Education".
P.N. 52.

(07) M.B. BUCH (EDITOR)...

"Second survey of Research in Education".
P.N. 484.

(08) M.B.BUCH (EDITOR)...

"Second survey of Research in Education".
P.N. 479.

(09( M.B. BUCH (CHIEF EDITOR)...

"Fourth Survey of Research in Education".
Volume - II (1983-88)

Published at the publication Department by the secretary, National council of Educational research and Traning, Sri Aurobin-do marg New Delhi - 110016, laser types at united India periodicals Pvt. Ltd. Link House Bahadur Shah Zafar Marg New Delhi - 110002. and printed at print - O - Bind - B - 27 sector - 7, NOIDA (U.P.)
P.N. 1086.

------x------